# वैशालीचा देदीप्यमान विजय!

## कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेत ऐतिहासिक विजय

**महाईन्यूज । नवी दिल्ली**



**भारताच्या २५ वर्षीय रमेशबाबू वैशालीने 'कँडिडेट्स' बुद्धिबळ स्पर्धा जिंकत नवा इतिहास घडवला. ही स्पर्धा जिंकून जगज्जेत्या जू वेन्जूनची आव्हानवीर बनणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. परंतु कायम डोके शांत ठेवून आणि आणीबाणीच्या काळात डगमगून न जाता वैशालीने हे यश मिळवले आहे.**

आठ खेळाडूंमध्ये सर्वांत कमी रेटिंगची खेळाडू वैशाली होती आणि तिला कोणी खिजगणतीतही धरत नव्हते. माजी जगज्जेती टॅन झोंगयी आणि अग्रमानांकित झू जिनेर या चिनी खेळाडूंचा दबदबा होताच! विश्वचषक विजेती दिव्या देशमुख आणि माजी 'कँडिडेट्स' विजेती ॲलेक्सांड्रा गोर्याचकिना यांनाही जाणकार कौल देत होते.

ससा-कासवाच्या शर्यतीची जी कथा आहे, तसेच काहीसे सायप्रसच्या निसर्गरम्य बेटावर घडले. वैशालीची सुरुवात अतिशय धीमी होती. पहिले चार डाव बरोबरीत सुटल्यावर पाचवा डाव ती झू जिनेरविरुद्ध हरली, त्या वेळी ती सर्वांत तळाला होती. पण वैशालीच्या खेळाचा इतिहास पाहता आणि विशेषत: तिची २०२४ मधील कामगिरी बघता ती आता चमत्कार घडवणार अशी तिच्या चाहत्यांना अपेक्षा होती. त्या प्रमाणे तिने पुढील चारपैकी तीन डाव जिंकून आघाडी घेतली. तिच्या प्रतिस्पर्धी गडबडून गेल्यासारख्या तिच्याविरुद्ध खेळत होत्या. गेल्या अर्थात कॅनडा येथे झालेल्या २०२४ सालच्या कँडिडेट्समध्येही वैशालीने अशीच काही करामत केली होती.

त्या वेळी पहिल्या नऊ फेऱ्यांमध्ये विजयाच्या दुष्काळात राहणाऱ्या झुंजार वैशालीने त्यानंतर विजयांचा धडाका लावून अखेरच्या पाच डावांत आपल्या प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम केले आणि चक्क दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली होती. सायप्रसमध्ये वैशाली प्रगल्भ झाल्याचे तिच्या खेळावरूनच नव्हे तर तिच्या निकालावरूनही स्पष्ट दिसत होते. एकदा संयुक्त आघाडी घेतल्यावर तिच्या बरोबरच्या आघाडीवीर बदलत होत्या, पण वैशाली मात्र अढळ होती.




# जर्मन इन्फ्लुएन्सरच्या पोस्टवर कोहलीचा लाईक; सोशल मीडियावर खळबळ

**महाईन्यूज । मुंबई**

**क्रिकेटचा किंग विराट कोहलीचा मोठा चाहता वर्ग आहे. त्यामुळे विराटचे सोशल मीडियावर आणि त्याच्या पोस्टवर, हालचालींवर चाहत्यांची बारीक नजर असते. गेल्या वर्षी, त्याच्या अकाऊंटवरून अभिनेत्री अवनीत कौरच्या एका ग्लॅमरस फोटोला लाईक केल्याची बातमी व्हायरल झाली होती. यावेळेस आता विराटने जर्मन इन्फ्लुएन्सरचा एक फोटो लाईक आहे, ज्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे.**






विराटने काही महिन्यांपूर्वी अवनीत कौरचा फोटो लाईक केला होता. तेव्हा त्याचा स्क्रीनशॉट सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरला आणि चाहत्यांमध्ये मोठ्या चर्चेला सुरुवात झाली. त्यानंतर विराटने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रकरणावर स्पष्टीकरण दिले आणि लिहिले की, त्याची फीड क्लिअर करताना अल्गोरिदममुळे ही चूक झाली. आता विराटने या इन्फ्लुएन्सरच्या फोटोवर लाईक केल्यानंतर पुन्हा अल्गोदिरमची चूक झाली का असा खोडकर प्रश्न चाहते विचारत आहेत.

विराट कोहलीने जर्मन इन्फ्लुएन्सर लिझलॅझच्या एका जुन्या इन्स्टाग्राम पोस्टला लाईक केलं आहे. चाहत्यांनी या पोस्टवर मीम्स आणि विनोदांचा वर्षाव केला आहे. लिझलॅझचे इन्स्टाग्राम हँडल LIZLAZ_TV आहे आणि ती विराट कोहलीची खूप मोठी चाहती आहे. एका मुलाखतीत तिने उघडपणे सांगितलं होतं की विराट तिचा आवडता क्रिकेटपटू आहे आणि ती स्वतःला त्याची एकनिष्ठ चाहती मानते. काही रील्समध्ये तिने आरसीबीची जर्सीसुद्धा घातलेली आहे. लिझलॅझने ३० जानेवारी रोजी एक फोटो पोस्ट केला होता, ज्याला विराटने लाईक केलं आहे. महत्त्वाचं म्हणजे, विराट तिला फॉलो करत नाही.

चाहत्यांनी लगेचच याचा संबंध गेल्या वर्षीच्या एका घटनेशी जोडला, जेव्हा विराटने चुकून अवनीत कौरच्या पोस्टला लाईक केलं होतं. आता चाहत्यांनी या घटनेवर सोशल मीडियावर मजेशीर प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका चाहत्याने लिहिलं, "आता अल्गोरिदम दुसरा पॅराग्राफ लोड करत आहे." काहींनी तर गंमतीने म्हटले, "विराट भाई अजूनही मुलींच्या फोटोंना लाईक




करतोय. अनुष्काला सांगा." तो लाइक हेतुपुरस्सर होता की अल्गोरिदममधील त्रुटी होती, हे अस्पष्ट आहे, परंतु या घटनेमुळे सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली आहे.

## कोण आहे जर्मन इन्फ्लुएन्सर लिझलॅझ?

लिझलॅझ ही एक जर्मन सोशल मीडिया क्रिएटर, ट्रॅव्हल व्लॉगर, खवय्यी आणि गायिका आहे. तिचा दक्षिण आफ्रिकेशी खास कनेक्शन आहे. ती प्रामुख्याने प्रवास आणि संस्कृतीवर आधारित व्लॉग्स बनवते. तिने मानसशास्त्र विषयात एमएससी केलं आहे. तिला प्रवास करायला आणि विविध शहरे व देश फिरायला आवडतं, तसेच तिला त्या शहरांमधील खाद्यसंस्कृतीचाही आस्वाद घ्यायला आवडतोतिचे इनस्टाग्रामवर ४ लाखांपेक्षा जास्त फॉलोअर्स आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शनिवार ।
दि. 18 एप्रिल 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# महानगरपालिकेत आता आरोग्य व वैद्यकीय समिती

## भाजपा नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या मागणीला मोठे यश

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील शहर सुधारणा समितीने शहरातील नागरिकांच्या आरोग्यविषयक वाढत्या समस्या लक्षात घेऊन नव्याने “आरोग्य व वैद्यकीय समिती” स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव मांडला आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या प्रशासकीय रचनेत आरोग्य क्षेत्राला स्वतंत्र आणि अधिक प्रभावी व्यासपीठ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



या विषयावर भाजपा नगरसेवक आणि प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ.सुहास कांबळे आणि राष्ट्रवादीच्या नगरसेविका तथा शहर सुधारणा समितीच्या सदस्या डॉ. वैशाली घोडेकर यांनी संयुक्त प्रस्ताव सादर केला असून, शहरातील आरोग्य सेवा अधिक गतिमान, परिणामकारक आणि नागरिककेंद्रित करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे.

सध्या महानगरपालिकेमध्ये पाच विषय समित्या कार्यरत आहेत. मात्र, शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित समस्या अधिक गुंतागुंतीच्या होत असल्याने स्वतंत्र आरोग्य समितीची गरज भासत असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. शहर सुधारणा समितीच्या ठराव क्र. ३, दिनांक १०/०३/२०२६ नुसार या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली असून, त्यास अनुकूल शिफारस करण्यात आली आहे.




### आयुक्तांचा सकारात्मक प्रतिसाद..

दरम्यान, या मुद्द्यावर महापालिका सर्वसाधारण सभेतही डॉ. सुहास कांबळे यांनी विशेष लक्ष वेधले होते. तसेच, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या समितीच्या आवश्यकतेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मुंबई महापालिका अधिनयमानुसार, वैद्यकीय व आरोग्य समिती स्थापन करण्याबाबत चाचपणी करावी. समितीची रचना, उद्देश आणि सदस्य संख्या याबाबत अहवाल तयार करावा, अशी सूचना केली आहे. आता समितीच्या स्थापनेचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत आहे. त्याला मान्यता मिळाल्यास समितीच्या स्थापनेचा मार्ग मोकळा होणार आहे.

> “ पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वतंत्र आरोग्य व वैद्यकीय समिती स्थापन होणे ही काळाची गरज आहे. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला असून, आता त्याला यश मिळताना दिसत आहे. यामुळे आरोग्य सेवा अधिक गतिमान आणि परिणामकारक होतील, असा विश्वास आहे.
>
> – डॉ. सुहास कांबळे, नगरसेवक, भाजपा.

### ४० लाख नागरिकांच्या आरोग्यासाठी निर्णायक पाऊल

पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ४० लाख नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही समिती अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्य समस्या, साथीचे आजार, तसेच तातडीच्या वैद्यकीय सेवांची गरज लक्षात घेता स्वतंत्र समितीमुळे निर्णय प्रक्रिया अधिक जलद आणि परिणामकारक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.नवीन आरोग्य व वैद्यकीय समिती स्थापन झाल्यास पुढील फायदे अपेक्षित आहेत— शहरातील आरोग्यसेवांमध्ये जलद निर्णय प्रक्रिया, रुग्णालये व आरोग्य केंद्रांचे प्रभावी नियोजन, साथीच्या आजारांवर तातडीने नियंत्रणख नागरिकांना अधिक सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा असा फायदा होणार आहे. शहराच्या वाढत्या आरोग्य गरजा लक्षात घेता स्वतंत्र समितीची स्थापना हा एक दूरदृष्टीचा आणि महत्त्वपूर्ण निर्णय ठरू शकतो. आता हा प्रस्ताव महापालिका सभेच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येणार असून, त्यावर सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य व्यवस्थापनाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थ्यांनी देशासाठी अर्थपूर्ण योगदान द्यावे; कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**नवीन तंत्रज्ञानातून मिळणाऱ्या ज्ञानाचा वापर जबाबदारीने केला पाहिजे. शिक्षण वर्ग खोल्यांपुरते मर्यादित न राहता सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवण्याचे साधन बनले पाहिजे. यातून विद्यार्थ्यांनी देशासाठी अर्थपूर्ण योगदान द्यावे असे प्रतिपादन पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनावणे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ आणि टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल लिमिटेड (टीएमपीव्हीएल) यांच्या संयुक्त सहयोगाने कौशल्य आणि नॅशनल अप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीम (एनएपीएस) अंतर्गत मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी सर्टिफिकेट व डिप्लोमा प्रोग्रामच्या पहिल्या तुकडीचे उद्धघटन आणि स्वागत करण्यात आले.

यावेळी टाटा मोटर्सचे वरिष्ठ अधिकारी प्लांट हेड नीरज अग्रवाल, एचआर हेड विवेक बिंद्रा, कॉर्पोरेट लर्निंग अँड डेव्हलपमेंट हेड डॉ. रंगा गुंटी, आणि ईआर हेड संतोष बढे, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, प्रोग्रामचे हेड डॉ. उमेश पोतदार, डॉ. अमित पाटील (डीन, स्कूल ऑफ मॅनेजमेंट), डॉ. विजय पाटील (डीन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभाग), डॉ. अभिजीत बनुबाकोडे (डायरेक्टर, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग), डॉ. भारत काळे (डायरेक्टर, संशोधन व विकास), डॉ. कमलेश मेश्राम (हेड, स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स), डॉ. नीरू मलिक (असोसिएट डायरेक्टर, सेंटर ऑफ इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्योरशिप), डॉ. पल्लवी आहिरे, डॉ. प्रणव चरखा, डॉ. सतपालसिंग राजपूत, डॉ. शंकर देवसरकर, डॉ. स्वाती शिर्के, डॉ. रामदास बिरादार, आदी उपस्थित होते.

पीसीइटी विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य व उद्योजक अजिंक्य काळभोर व नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### उद्योग व शैक्षणिक संस्था सहकार्य वाढणार..!

टाटा मोटर्सचे प्लांट हेड नीरज अग्रवाल यांनी सांगितले की, या संयुक्त उपक्रमामुळे उद्योग व शैक्षणिक संस्था सहकार्य वाढून विद्यार्थ्यांना उद्योजक बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावता येईल. यात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ सैद्धांतिक न राहता प्रत्यक्ष अनुभव, शिस्त आणि नवोन्मेष यांद्वारे समृद्ध होईल. यामुळे कुशल तांत्रिक मनुष्यबळ विकसित होऊन भविष्यात सक्षम व्यावसायिक घडतील असा विश्वास आहे. प्रोग्रामचे हेड डॉ. उमेश पोतदार यांनी सांगितले की, वर्गातील शिक्षण आणि प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव यांचे प्रभावी एकत्रीकरण करून हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. त्यांना शिकण्याची, काम करण्याची आणि या माध्यमातून आयुष्य बदलण्याची संधी उपलब्ध झाली आहे. हे विद्यार्थी दर्जेदार शिक्षण आणि औद्योगिक, व्यावहारिक अनुभव घेऊन सक्षम बनतील. प्राध्यापकांनी अत्याधुनिक असेंब्ली लाईन्स, रोबोटिक ऑटोमेशन आणि महिला नेतृत्वाखाली सुरू असलेल्या उत्पादन विभागास भेट देऊन माहिती घेतली.

स्किल डेव्हलपमेंट हेड शशिकांत रोडे यांनी टाटा मोटर्स प्लांटचा इतिहास, सध्याचे उपक्रम आणि भविष्यातील दृष्टीकोन याबद्दल माहिती दिली. सुत्र संचालन पूनम बोरले यांनी केले.

# मास्टर माईंड ग्लोबल स्कूलची 'शंभरी'

## शिक्षण विश्व: सीबीएसई दहावी परीक्षेत यशाची परंपरा कायम

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेल्या 'मास्टर माईंड ग्लोबल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज'ने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (CBSE) इयत्ता दहावीच्या निकालात यंदाही १००% यशाची मोहोर उमटवली आहे. उत्कृष्ट अध्यापन आणि नियोजनाच्या जोरावर शाळेने आपली यशाची परंपरा दिमाखात कायम राखली आहे.**






यंदाच्या परीक्षेत शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले: आर्यन पवार -९८.२०%, अवनी जाधव -९८.००%, समीक्षा पाटील -९६.६०%, क्रिषाला दळवी -९५.४०%, या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांची जिद्द, विषय शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि पालकांनी दिलेले भक्कम पाठबळ या त्रिवेणी संगमामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

शाळेच्या या निकालामुळे परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, शैक्षणिक गुणवत्ता राखण्यात मास्टर माईंड ग्लोबल स्कूलने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

> आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाचे आणि कष्टाचे फळ आहे. केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच आमचे उद्दिष्ट आहे. या यशात शिक्षक आणि पालकांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. मी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करते आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देते.
>
> – डॉ. प्रदीपा नायर, मुख्याध्यापिका.



ईशान गाडेकर 98.80% | अवनी मंडोत 98% | मनस्वी मराठे 98%

## प्रतिभा इंटरनॅशनल स्कुलचा १०० टक्के निकाल

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा इंटरनॅशनल स्कुलचा इयत्ता १०वी (सी.बी.एस.ई) बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकाल लागला. शाळेत ईशान गाडेकर याने ९८.८० टक्के गुण मिळवून प्रथम आला. इंग्रजी व आयटीत १०० पैकी १०० गुण तर सामाजिक शास्त्र विषयात ९९ गुण मिळविले.

अवनी मंडोत व मनस्वी मराठे यांनी ९८ टक्के गुण मिळवून दुसऱ्या क्रमांक पटकावला. त्यांनी इंग्रजी व आयटी विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले. तर निश्चल बडजाते याने ९७.८० टक्के मिळवून तिसरा आला. याने देखील आयटी व इंग्रजी १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. तर पहिल्या दहामध्ये रुद्र मंचेकर, तन्वी कापसे, वेदांत सुर्वे, आरुल महिंद्रकर, रघुवीर बिरादार, अन्विता चिंचोलीकर, प्रज्वल रेखावर यांनी देखील ९४.६० टक्क्यांपैकी जास्त गुण मिळवून व यश प्राप्त केले.

या शाळेतील विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव डॉ.दिपक शहा, खजिनदार डॉ.भूपाली शहा, संचालिका डॉ.तेजल शहा याच्या समवेत विविध शिक्षण संस्थेचे प्राचार्य , प्राचार्या व संचालकांनी प्रतिभा इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्या डॉ.वृंदा मुलतानी जोशी, उपप्राचार्या लिझा सोजू, समन्वयिका गुलनाज खान व इतर शिक्षकांचा शाळेचा शंभर टक्के निकालासाठी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल कौतुक केले व उत्कृष्ट कामगिरी प्रित्यार्थ कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ . दीपक शहा यांनी संस्थेच्या वतीने सर्वाचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

## आकुर्डीच्या डी. वाय. पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा डंका

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडमधील नामांकित डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आकुर्डी येथील सिव्हिल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी पुण्यातील वाघोली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत आपल्या संशोधनाचा ठसा उमटवला आहे. या परिषदेत विद्यार्थ्यांच्या संशोधन निबंधाला मानाचा 'बेस्ट पेपर अवॉर्ड' देऊन गौरवण्यात आले.**




> आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर 'बेस्ट पेपर अवॉर्ड' मिळवणे, ही संस्थेसाठी अभिमानाची गोष्ट आहे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती जोपासणे आणि त्यांना जागतिक दर्जाच्या व्यासपीठावर संधी उपलब्ध करून देणे, हे आमचे नेहमीच उद्दिष्ट राहिले आहे. साद, अनिकेत आणि दिलीप यांनी मांडलेले हे संशोधन सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रातील भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी उपयुक्त ठरेल. या यशाबद्दल विद्यार्थी आणि त्यांच्या मार्गदर्शकांचे मी मनापासून अभिनंदन करतो.
>
> – सतेज पाटील (चेअरमन)

> केवळ पदवी मिळवणे हा शिक्षणाचा उद्देश नसून, प्राप्त ज्ञानाचा उपयोग नाविन्यपूर्ण संशोधनासाठी करणे आवश्यक आहे. संरचनांच्या सुरक्षेसाठी आमच्या विद्यार्थ्यांनी ट्यूनड मास डॅम्परवर केलेले संशोधन तांत्रिकदृष्ट्या प्रगत आहे. अशा प्रकारच्या यशांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना अधिक चांगल्या कामगिरीसाठी प्रोत्साहन मिळते. विद्यार्थ्यांच्या या यशात संपूर्ण सिव्हिल अभियांत्रिकी विभागाच्या मेहनतीचा मोठा वाटा आहे.
>
> – रियर ॲडमिरल अमित विक्रम (नि.) (संचालक)

पुणे येथील जेएसपीएम विद्यापीठ, वाघोली येथे १४ व १५ फेब्रुवारी २०२६ रोजी या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत जगभरातील संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सिव्हिल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी साद अन्सारी, अनिकेत जैस्वाल आणि दिलीप जट यांनी या परिषदेत सहभाग घेतला. त्यांनी "संरचनांमध्ये कंपन नियंत्रणासाठी ट्यूनड मास डॅम्पर (TMD) चे डिझाइन व विश्लेषण" या विषयावर आपले संशोधन सादर केले. इमारती आणि पुलांसारख्या मोठ्या वास्तूंमधील कंपने नियंत्रित करण्यासाठी ट्यूनड मास डॅम्परचे महत्त्व आणि त्याचे तांत्रिक विश्लेषण त्यांनी प्रभावीपणे मांडले. त्यांच्या या नाविन्यपूर्ण सादरीकरणाची दखल घेत परीक्षकांनी त्यांना सर्वोत्कृष्ट निबंधाचा पुरस्कार जाहीर केला.

या संशोधनासाठी विद्यार्थ्यांना सिव्हिल अभियांत्रिकी विभागाच्या प्रा. स्नेहा सावंत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे:

चेअरमन: सतेज पाटील, विश्वस्त: तेजस पाटील संचालक: रियर ॲडमिरल अमित विक्रम (नि.),प्राचार्या: डॉ. पी. मालती, विभागप्रमुख: डॉ. अशोक मोरे या सर्वांनी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक प्रा. स्नेहा सावंत यांचे विशेष अभिनंदन केले आहे. आकुर्डी परिसरासह शैक्षणिक क्षेत्रातून या विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# Industry Leader Dr. Pramod Chaudhari Awarded Honorary Doctorate by D. Y. Patil International University, Akurdi

**MahaENews | PUNE**






**D. Y. Patil International University (DYPIU), Pune, organized a Special Convocation Ceremony to confer the prestigious Honorary Doctorate (Honoris Causa) upon eminent industrialist and visionary leader Dr. Pramod Chaudhari, Founder Chairman and Mentor of Praj Industries.**

Dr. Chaudhari's contributions to innovation, sustainable development, and global leadership in bioenergy and agri-processing technologies has been exemplary.

While delivering his acceptance speech, Dr. Chaudhari emphasized the critical need to foster a strong culture of entrepreneurship in India. Reflecting on his own journey, he shared that in 1983, during the early days of establishing Praj, he personally approached bank managers to explain the concept of venture capital—an idea that was relatively unfamiliar at the time. His experience underscored the importance of resilience, vision, and belief in innovation.

He also highlighted the significance of implementing the National Education Policy 2020 in its true spirit, stressing that education must go beyond theoretical knowledge to nurture creativity, critical thinking, and entrepreneurial capabilities among students.

Further, Dr. Chaudhari underscored the importance of collaboration with reputed institutions and experienced professionals, noting that their association with universities can significantly broaden students' career perspectives and contribute to holistic academic development.

The Vice Chancellor, Prof. Manish Bhalla, reiterated the university's commitment to academic excellence and industry engagement. The ceremony reflected DYPIU's vision of bridging academia and industry while celebrating leaders who have made transformative contributions to society.

The ceremony witnessed the gracious presence of senior academic leaders, Deans, Directors, faculty members, and distinguished guests. The event commenced with traditional rituals, including Ganapati Pujan, followed by felicitation and formal academic proceedings.

The conferment of the Honorary Doctorate upon Dr. Chaudhari marks a proud and defining moment for DYPIU, reaffirming its commitment to bridging academia with industry and celebrating transformative leadership. The ceremony serves as a powerful inspiration for students to innovate, lead, and create meaningful impact in an evolving global landscape.

## 100% CBSE Class 10 Result: Rajmata Jijau Education Trust Students Shine with Excellence

**MahaENews | PIMPRI CHINCHWAD**

**In a remarkable academic achievement, Gyanbhakti International School under the Rajmata Jijau Shikshan Prasarak Mandal, Dudulgaon, has secured a 100% pass result in the CBSE Class 10 examinations, marking a proud milestone for the institution.**



All students from the school successfully cleared the examination, continuing the institution's legacy of academic excellence and quality education. This outstanding performance reflects the school's commitment to holistic development and consistent academic rigor.

Among the top performers, Mayuri Maskare (91.2%), Shreya Khot (91%), Harshita Suryavanshi (91%), Shraddha Solanki (91.2%), Sai Satish Patil (90.2%), and Lukesh Nilesh Nehete (90%) secured exceptional scores, earning special distinction.

Out of a total of 71 students, an impressive 56 students scored above 90 marks in individual subjects, highlighting the strong academic foundation and subject mastery achieved by the students.

School Principal Dr. Urmila Jadhav attributed this success to the dedicated efforts of teachers, consistent practice by students, and unwavering support from parents and the institution.

The management of the institution, including President and former Bhosari MLA Vilasrao Lande, Secretary Sudhir Mungse, Treasurer Ajit Gawhane, and Trustees Vikrant Lande, Prof. Kiran Chaudhari, Pramod Bochare, along with Registrar Ashwini Chavan, congratulated the students and teaching staff for their commendable performance.

Special credit for this achievement was also extended to Principal Dr. Urmila Jadhav, Coordinators Kalyani Kerhalakar and Amruta Vilaskar, and the entire teaching faculty for their guidance and mentorship.

Notably, this was the first batch of Class 10 students from the school, making the achievement even more significant. The success has created a wave of pride and celebration across the region, setting a strong benchmark for future academic endeavors.

## Proud Achievement by Student of Priyadarshini School, Moshi

**MahaENews | PIMPRI CHINCHWAD**




Priyadarshani School, Moshi proudly announces the remarkable achievement of its grade 7 student Samruddhi Ligade who has won a Gold Medal in a Martial Arts Championship held in Hyderabad.

Samruddhi showcased exceptional skill, discipline, and determination while competing against talented participants from various regions. Her outstanding performance and dedication led her to secure the top position in the championship.

The school management, principal, and staff have extended their heartfelt congratulations to Samruddhi for bringing pride and honor to the institution. Her achievement is an inspiration for fellow students to pursue excellence in both academics and co-curricular activities.

The school also appreciates the support and encouragement provided by her parents and coaches, which played a vital role in her success.

Priyadarshini School remains committed to nurturing young talents and providing a platform for students to excel in various fields.